भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# दहशतग्रस्त क्षेत्रे (विशेष न्यायालये) अधिनियम, १९८४

**(सन १९८४ चा अधिनियम क्रमांक ६१)**

[१ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान]

# The Terrorist Affected Areas (Special Courts) Act, 1984

**(Act No. 61 of 1984)**

[*As in force on the 1st March, 1998*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
२०००

**[ किंमत : रु. ४.०० ]**

**प्राक्कथन**

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि टेररिस्ट अ‍ॅफेक्टेड एरिया (स्पेशल कोर्टस्) अ‍ॅक्ट, १९८४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक १, दिनांक ८ ऑक्टोबर १९९८ यात पृष्ठ ३० ते ३८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ८ ऑक्टोबर १९९८.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

**PREFACE**

This edition of The Terrorist Affected Areas (Special Courts) Act, 1984 as on the 1st March, 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 9, dated 8th October 1998 on pages 30 to 38.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2 Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on scuh publication it became the authoritative text of that Act in Marathi.

DR. RAGHBIR SINGH,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Dated 8th October 1998.

# दहशतग्रस्त क्षेत्रे (विशेष न्यायालये) अधिनियम, १९८४

## कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. दहशतग्रस्त क्षेत्र घोषित करणे.
४. विशेष न्यायालयाची स्थापना.
५. विशेष न्यायालयाची घडण व न्यायाधीशांची नियुक्ती.
६. बैठकीचे ठिकाण.
७. विशेष न्यायालयांची अधिकारिता.
८. अन्य अपराधांबाबतच्या विशेष न्यायालयाच्या शक्ती.
९. सरकारी अभियोक्ते.
१०. विशेष न्यायालयाची कार्यपद्धती व शक्ती.
११. प्रकरण हस्तांतरित करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या शक्ती.
१२. साक्षीदारांना संरक्षण.
१३. नेहमीच्या न्यायालयाकडे प्रकरणे हस्तांतरित करण्याच्या शक्ती.
१४. अपील.
१५. संहितेचे विवक्षित उपबंध सुधारित रीतीने लागू होणे.
१५क. विवक्षित विशेष न्यायालये बरखास्त करणे.
१६. अधिनियमाचे अधिभावी परिणाम.
१७. प्रत्यायोजन.
१८. नियम करण्याची शक्ती.
१९. व्यावृत्ती.
२०. १८७२ चा अधिनियम १ याचे विशोधन.
२१. निरसन व व्यावृत्ती.
अनुसूची.

# दहशतग्रस्त क्षेत्रे (विशेष न्यायालये) अधिनियम, १९८४

(१९८४ चा अधिनियम क्रमांक ६१)

(१ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान)

[३१ ऑगस्ट, १९८४]

**दहशतग्रस्त क्षेत्रातील विवक्षित अपराधांची त्वरित संपरीक्षा करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित बाबींकरिता उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास दहशतग्रस्त क्षेत्रे (विशेष न्यायालये) अधिनियम, १९८४ असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो, दिनांक १४ जुलै, १९८४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. (१) या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर— **व्याख्या.**

(क) "संहिता" याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), असा आहे;

(ख) "उच्च न्यायालय" याचा विशेष न्यायालयांच्या संबंधात अर्थ, ज्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रीय हद्दीत असे विशेष न्यायालय स्थापन करावयाचे आहे किंवा तसे स्थापन करण्यात आलेले आहे ते उच्च न्यायालय, असा आहे ;

(ग) "न्यायिक परिक्षेत्र" याचा अर्थ, कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेले न्यायिक परिक्षेत्र, असा आहे ;

(घ) "अधिसूचना" याचा अर्थ, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे ;

(ङ) "सरकारी अभियोक्ता" याचा अर्थ, कलम ९ अन्वये नियुक्त केलेला सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता, असा आहे ; आणि यात सरकारी अभियोक्त्याच्या निदेशांन्वये कार्य करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(च) "अनुसूचित अपराध" याचा अर्थ, दहशतग्रस्त क्षेत्रात घडलेला, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला अपराध, असा आहे ;

(छ) "विशेष न्यायालय" याचा अर्थ, कलम ४ अन्वये स्थापन केलेले विशेष न्यायालय किंवा अतिरिक्त विशेष न्यायालय, असा आहे ;

(ज) "दहशतवादी" याचा अर्थ, व्यक्तींची स्वैरपणे हत्या करणारी किंवा हिंसाचार करणारी, समाजास अत्यावश्यक असलेल्या सेवा किंवा दळणवळणाची साधने यांची मोडतोड करणारी; किंवा—

(एक) समाजाच्या किंवा समाजाच्या कोणत्याही वर्गाच्या मनात भीती निर्माण करण्याच्या हेतूने; किंवा

(दोन) विविध धर्मीय, वंशीय, भाषिक किंवा प्रादेशिक गटात किंवा जातीमध्ये किंवा समाजामध्ये प्रतिकूल परिणाम घडवून आणण्याच्या हेतूने; किंवा

(तीन) कायद्याद्वारे स्थापित शासनावर सक्ती करण्याच्या किंवा दहशत बसविण्याच्या हेतूने, किंवा

(चार) भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता धोक्यात आणण्याच्या हेतूने,—

—एखाद्या संपत्तीस हानी पोहचविण्याचे कृत्य करणारी अशी एखादी व्यक्ती, असा आहे ;

(झ) "दहशतग्रस्त क्षेत्र" याचा अर्थ, कलम ३ अन्वये दहशतग्रस्त क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र, असा आहे;

(ञ) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि संहितेत व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संहितेत अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

(२) या अधिनियमातील संहितेच्या किंवा तिच्या कोणत्याही उपबंधाच्या ज्या क्षेत्रात ती संहिता किंवा तो उपबंध अंमलात नसेल अशा क्षेत्राच्या संबंधातील निर्देशाचा अर्थ, त्या क्षेत्रात अंमलात असलेल्या तत्सम कायद्याचा किंवा तत्सम कायद्याच्या संबंधित उपबंधाचा निर्देश आहे, असा लावला जाईल.

३. (१) जर केंद्र शासनाचे असे मत असेल की, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचे अपराध एखाद्या क्षेत्रात दहशतग्रस्तांकडून अशा प्रमाणात व अशा रीतीने केले जात आहेत की ज्यामुळे अशा दहशतग्रस्तांच्या कृत्यांना तोंड देण्याच्या प्रयोजनाकरिता या अधिनियमाच्या उपबंधांचा अवलंब **दहशतग्रस्त क्षेत्र घोषित करणे.**

करणे इष्ट आहे, तर अधिसूचनेद्वारे केंद्र शासनाला :—

(क) असे क्षेत्र दहशतग्रस्त क्षेत्र म्हणून घोषित करता येईल, आणि

(ख) असे क्षेत्र, त्याला योग्य वाटेल तसे एका न्यायिक क्षेत्रात किंवा अनेक न्यायिक क्षेत्रांत घटित करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये एखाद्या क्षेत्राबाबत काढलेल्या अधिसूचनेत, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ज्या अवधीसाठी ते क्षेत्र दहशतग्रस्त क्षेत्र असेल, तो अवधी विनिर्दिष्ट केला जाईल आणि जेव्हा केंद्र शासनाचे असे मत असेल की, ती अधिसूचना काढण्यात आल्याच्या दिनांकाच्या आधीपासून त्या क्षेत्रात दहशतवादी, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचे अपराध अशा प्रमाणावर व अशा रीतीने करीत आहेत की, ज्यामुळे अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला अवधी हा, अशा पूर्वीच्या दिनांकापासून सुरू करणे इष्ट आहे, तेव्हा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला अवधी हा त्या दिनांकापासून सुरू होईल:

परंतु,—

(क) अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकाच्या पूर्वीच्या सहा महिन्यांअगोदरच्या दिनांकापासून सुरू होणारा अवधी त्यात विनिर्दिष्ट करण्यात येणार नाही; आणि

(ख) अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अवधीचा, त्या अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकानंतरचा भाग हा, प्रारंभी सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, परंतु त्या क्षेत्रातील दहशतवाद्यांची कृत्ये लक्षात घेता केंद्र शासनाला जर तसे करणे इष्ट वाटले तर, केंद्र शासनाला अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी तो कालावधी, एकावेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल एवढ्या अवधी-करिता वाढवता येईल.

**स्पष्टीकरण.**—शंका टाळण्यासाठी, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या कलमान्वये काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला अवधी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वीच्या दिनांकास सुरू होईल.

विशेष न्यायालयांची स्थापना.

४. (१) न्यायिक परिक्षेत्रात घडलेल्या अनुसूचित अपराधांची त्वरित संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र शासन अधिसूचनेद्वारे अशा न्यायिक परिक्षेत्राशी निगडीत विशेष न्यायालयाची स्थापना पुढीलप्रमाणे करील :—

(क) अशा न्यायिक परिक्षेत्रात; किंवा

(ख) जर केंद्र शासनास, अशा न्यायिक परिक्षेत्रात चालू परिस्थितीची गरज लक्षात घेता तसे करणे आवश्यक वाटत असेल तर, अशा न्यायिक परिक्षेत्राबाहेर, परंतु असे न्यायिक परिक्षेत्र ज्या राज्यात असेल त्या राज्यात.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्यातील चालू परिस्थितीची गरज लक्षात घेता, राज्य शासनाचे जर असे मत असेल की, राज्यातील एखाद्या न्यायिक परिक्षेत्राच्या संबंधात किंवा एक किंवा एकापेक्षा अधिक न्यायिक परिक्षेत्रांच्या संबंधात एक अतिरिक्त विशेष न्यायालय, अशा न्यायिक परिक्षेत्रामध्ये किंवा परिक्षेत्रांमध्ये घडणाऱ्या ज्या अनुसूचित अपराधांची राज्यात,—

(क) संपरीक्षा करणे उचित ठरणे किंवा निःपक्षपातीपणाचे ठरणे किंवा ती लवकर पूर्ण करणे संभवनीय नसेल, किंवा

(ख) शांततेचा भंग न करता किंवा आरोपी, साक्षीदार, सरकारी अभियोक्ता आणि न्यायाधीश यांना किंवा त्यांच्यापैकी कोणासही गंभीर धोका निर्माण न करता संपरीक्षा करणे शक्य नसेल, किंवा

(ग) न्यायाच्या दृष्टीने तसे करणे अन्यथा हितकारक नसेल,

त्या अपराधांच्या संपरीक्षेसाठी राज्याबाहेर स्थापन करणे इष्ट ठरेल तर, राज्य शासन केंद्र शासनास अशा न्यायिक परिक्षेत्राच्या किंवा परिक्षेत्रांच्या संबंधात राज्याबाहेर एक विशेष न्यायालय स्थापण्याची विनंती करू शकेल आणि तदनंतर केंद्र शासन, राज्य शासनाने दिलेली माहिती लक्षात घेऊन त्यास योग्य वाटेल अशी कोणतीही चौकशी केल्यावर, अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा राज्याबाहेरील ठिकाणी, असे अतिरिक्त विशेष न्यायालय स्थापन करील.

विशेष न्यायालयाची घडण व न्यायाधीशांची नियुक्ती.

५. (१) केंद्र शासनाने उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने नियुक्त करावयाचा न्यायाधीश हा, विशेष न्यायालयाचा पीठासीन न्यायाधीश असेल.

(२) केंद्र शासन, उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या सहमतीने अतिरिक्त न्यायाधीशाची, विशेष न्यायालयाच्या अधिकारितेचा वापर करण्याकरिता नियुक्ती करील.

(३) अशी नियुक्ती होण्याच्या लगतपूर्वी एखादी व्यक्ती कोणत्याही राज्यात सत्र न्यायाधीश किंवा अतिरिक्त सत्र न्यायाधीश असल्याखेरीज ती व्यक्ती, विशेष न्यायालयाची न्यायाधीश किंवा अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्ह ठरणार नाही.

(४) शंका निरसनार्थ याद्वारे असे उपबंधित करण्यात येते की, विशेष न्यायालयाचा न्यायाधीश किंवा अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने ज्या सेवेत ती होती त्या सेवेमध्ये तिला लागू असलेल्या नियमान्वये तिने नियत सेवावधी पूर्ण केल्यामुळे तिने, अशा न्यायाधीश किंवा अतिरिक्त न्यायाधीश म्हणून राहण्यास बाध येणार नाही.

(५) जेव्हा कोणत्याही अतिरिक्त न्यायाधीशाची किंवा न्यायाधीशांची विशेष न्यायालयात नियुक्ती करण्यात आलेली असेल तेव्हा, विशेष न्यायालयाचा न्यायाधीश, वेळोवेळी, लेखी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, विशेष न्यायालयाचे कामकाज स्वत:कडे आणि अतिरिक्त न्यायाधीशाकडे किंवा न्यायाधीशांकडे वाटून घेण्याकरिता आणि तो गैरहजर असताना किंवा कोणताही अतिरिक्त न्यायाधीश गैरहजर असताना, तातडीच्या कामकाजाची विल्हेवाट लावण्याकरिता सुद्धा उपबंध करील.

६. विशेष न्यायालय, जर त्याला तसे करणे इष्ट किंवा उचित वाटत असेल तर, ज्या राज्यात त्याची स्थापना झाली आहे, त्या राज्यातील त्याच्या बैठकीच्या सर्वसाधारण ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी त्याच्या कोणत्याही कार्यवाहीकरिता बैठक घेऊ शकेल : बैठकीचे ठिकाण.

परंतु, जर सरकारी अभियोक्ता विशेष न्यायालयाला असे प्रमाणित करील की, त्याच्या मते आरोपीच्या किंवा साक्षीदाराच्या सुरक्षिततेकरिता किंवा अन्यथा न्यायाच्या दृष्टीने इष्ट असल्याकारणाने संपूर्ण संपरीक्षा किंवा तिचा काही भाग त्याच्या बैठकीच्या सर्वसाधारण ठिकाणाव्यतिरिक्त एखाद्या विवक्षित अन्य ठिकाणी करणे आवश्यक आहे तर, आरोपीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर विशेष न्यायालय तशा अर्थाचा आदेश देईल. मात्र, विशेष न्यायालयाला अन्य कोणताही आदेश देणे योग्य वाटले, तर त्याची कारणे लेखी नमूद करून त्याला तसा अन्य आदेश देता येईल.

७. (१) संहितेत किंवा अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, ज्या कालावधीत राज्यातील एखादे न्यायिक परिक्षेत्र हे दहशतग्रस्त क्षेत्र किंवा त्याचा भाग असेल, अशा कालावधीत कोणत्याही वेळी, त्या न्यायिक परिक्षेत्रात घडलेल्या अनुसूचित अपराधांची संपरीक्षा, मग ती त्या कालावधीत असो किंवा तो समाप्त झाल्यावर असो, त्या राज्यात अशा न्यायिक परिक्षेत्राकरिता स्थापन केलेल्या विशेष न्यायालयाद्वारेच फक्त करता येण्याजोगी असेल : विशेष न्यायालयाची अधिकारिता.

परंतु, कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे ज्या कालावधीत एखादे क्षेत्र हे, दहशतवादी क्षेत्र म्हणून घोषित केलेले असेल, अशा कालावधी म्हणून त्या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी जेव्हा अशी अधिसूचना देण्यात आल्याच्या दिनांकाच्या पूर्वीपासून सुरू होत असेल तेव्हा,—

(क) या पोटकलमाच्या पूर्वगामी उपबंधातील कोणतीही गोष्ट, अशी अधिसूचना काढल्याच्या दिनांकाच्या पूर्वी, खटल्यासाठी लागणारा सर्व पुरावा ज्या क्षेत्रातून घेण्यात आला असेल अशा क्षेत्रात घडलेल्या अनुसूचित अपराधास लागू होणार नाही.

(ख) अशा क्षेत्रात घडलेले इतर सर्व अपराध आणि अशी अधिसूचना काढण्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेले अनुसूचित अपराध अंतर्भूत असलेली अन्य सर्व प्रकरणे, या कलमान्वये अधिकारिता असलेल्या विशेष न्यायालयाकडे हस्तांतरित होतील आणि ज्याकडे अशी कार्यवाही हस्तांतरित झाली असेल ते विशेष न्यायालय, अशा प्रकरणांवरील कार्यवाही, त्यावेळी ज्या टप्प्यांवर ती प्रलंबित असेल त्या टप्प्यांपासून पुढे चालू करील.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यातील कोणत्याही न्यायिक परिक्षेत्रात घडलेला एखादा अनुसूचित अपराध अंतर्भूत असलेल्या प्रकरणांच्या बाबतीत जर, कलम ४ च्या पोटकलम (२) चे उपबंध आणि प्रकरणाची वस्तुस्थिती व परिस्थिती आणि अन्य संबंधित बाबी लक्षात घेतल्यानंतर केंद्र शासनाचे असे मत झाले असेल की, अशा अपराधाची संपरीक्षा राज्याबाहेर अशा न्यायिक परिक्षेत्राच्या संबंधात स्थापन केलेल्या अतिरिक्त विशेष न्यायालयाद्वारे केली जाणे इष्ट आहे, तर केंद्र शासन तशा अर्थाची घोषणा करील :

परंतु, राज्य शासनाने केंद्र शासनाला अशी घोषणा करण्याकरिता लेखी विनंती करणारा अहवाल पाठविल्याशिवाय, अशी घोषणा करण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—जेव्हा, एक किंवा अधिक न्यायिक परिक्षेत्रांच्या संबंधात अतिरिक्त विशेष न्यायालय स्थापन केलेले असेल तेव्हा, असे अतिरिक्त विशेष न्यायालय हे, या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, अशा प्रत्येक न्यायिक परिक्षेत्राच्या संबंधात स्थापन केलेले आहे, असे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (२) अन्वये केलेल्या घोषणेस कोणत्याही न्यायालयात हरकत घेतली जाणार नाही.

(४) जेव्हा राज्यातील एखाद्या न्यायिक परिक्षेत्रात घडलेल्या कोणत्याही अपराधाबाबत कोणतीही घोषणा केली जाते तेव्हा, अशा अपराधाबाबतचा कोणताही खटला हा फक्त राज्याबाहेर त्या न्यायिक परिक्षेत्रांच्या संबंधात स्थापन केलेल्या अतिरिक्त विशेष न्यायालयातच चालविला जाईल आणि, जर, अशा अपराधाबाबतचा खटला अशा घोषणेच्या लगतपूर्वी कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असेल तर, तो अशा अतिरिक्त विशेष न्यायालयाकडे हस्तांतरित होईल आणि असे अतिरिक्त विशेष न्यायालय, हे, अशा प्रकरणांवरील कार्यवाही, त्यावेळेस ज्या टप्प्यावर प्रलंबित होती तेथपासून पुढे सुरू करील.

**अन्य अपराधां-बाबतच्या विशेष न्यायालयाच्या शक्ती.** ८. (१) कोणत्याही अनुसूचित अपराधाची संपरीक्षा करताना विशेष न्यायालय, अनुसूचित अपराधांव्यतिरिक्तच्या ज्या अन्य कोणत्याही अपराधाचा त्या आरोपीवर दोषारोप ठेवण्यात आला असेल तो अपराध जर अनुसूचित अपराधाशी संबंधित असेल, तर त्याच संपरीक्षेत त्या अपराधाचीही संपरीक्षा करील.

(२) जर या अधिनियमान्वये संपरीक्षा करीत असताना आरोपी व्यक्तीने कोणताही अपराध केलेला आहे असे आढळून आले तर, विशेष न्यायालय, अशा अपराधासाठी, मग तो अनुसूचित अपराध असो वा नसो अशा व्यक्तीला सिद्धदोषी ठरवील आणि त्यासाठीच्या शिक्षेकरता कायद्याद्वारे प्राधिकृत केलेला कोणताही शिक्षादेश देईल.

**सरकारी अभियोक्ते.** ९. (१) प्रत्येक विशेष न्यायालयासाठी केंद्र शासन, सरकारी अभियोक्ता म्हणून एखाद्या व्यक्तीला नियुक्त करील व एक किंवा अनेक व्यक्तींची अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त सरकारी अभियोक्ते म्हणून नियुक्ती करील :

परंतु, केंद्र शासन कोणत्याही प्रकरणांसाठी किंवा प्रकरणांच्या वर्गासाठी विशेष सरकारी अभियोक्त्याचीही नियुक्ती करील.

(२) एखादी व्यक्ती, जर कमीत कमी ७ वर्षे अधिवक्ता म्हणून व्यवसाय करत असेल किंवा तिने केंद्र सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली कमीत कमी सात वर्षे कायद्याचे ज्ञान आवश्यक असलेले असे पद धारण केलेले असेल तरच, ती या कलमान्वये, सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त होण्यास पात्र ठरेल.

(३) या कलमान्वये, सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त झालेल्या प्रत्येक व्यक्तीला संहितेच्या कलम २ च्या खंड (क) मधील अर्थांतर्गत सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल व त्यानुसार संहितेचे उपबंध परिणामक होतील.

**विशेष न्यायालयाची कार्यपद्धती व शक्ती.** १०. (१) विशेष न्यायालय, कोणत्याही अनुसूचित अपराधाची, तो ज्याद्वारे घटित झाला असेल त्या वस्तुस्थितीबाबतची तक्रार आल्यानंतर किंवा अशा वस्तुस्थितीबाबत पोलिसांचा अहवाल मिळाल्यावर, आरोपी व्यक्तीस संपरीक्षेसाठी न बोलावता, दखल घेऊ शकेल.

(२) जेव्हा एखादा अनुसूचित अपराध जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल तेव्हा, विशेष न्यायालय, संहितेचे कलम २६० किंवा कलम २६२ चे पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, संहितेमध्ये विहित केलेल्या कार्य-पद्धतीनुसार संक्षिप्त रीतीने संपरीक्षा करील आणि संहितेची कलमे २६३ ते २६५ यांचे उपबंध शक्य होईल तितपत अशा संपरीक्षेस लागू होतील :

परंतु, विशेष न्यायालयाला या पोटकलमान्वये संक्षिप्त संपरीक्षा करताना, जर त्या प्रकरणाच्या स्वरूपामुळे त्याची संक्षिप्तपणे संपरीक्षा करणे उचित नाही, असे आढळून आले तर, विशेष न्यायालय ज्यांची पूर्वी तपासणी झालेली असेल अशा कोणत्याही साक्षीदारास पुन्हा बोलावील व अशा अपराधाच्या संपरीक्षेकरिता संहितेतील उपबंधाद्वारे उपबंधित केलेल्या रीतीने त्या प्रकरणाची फेरसुनावणी सुरू करील व उक्त उपबंध हे, दंडाधिकाऱ्यास आणि दंडाधिकाऱ्यांच्या संबंधात जसे लागू होतात तसेच ते विशेष न्यायालयास आणि विशेष न्यायालयाच्या संबंधात लागू होतील :

आणखी असे की, या कलमान्वये संक्षिप्त संपरीक्षा करताना कोणतीही दोषसिद्धी झालेल्या प्रकरणात विशेष न्यायालयाने दोन वर्षांहून अधिक नसेल इतक्या अवधीच्या कारावासाची शिक्षा देणे कायदेशीर असेल.

(३) विशेष न्यायालयास, अपराधाशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित आहे किंवा त्यात सहभागी आहे असे समजण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीची साक्ष घेण्याच्या उद्देशाने अशा व्यक्तीला, तिने त्या अपराधाशी संबंधित अशी आणि त्याच्या घडण्याशी संबंधित असणारी अन्य प्रत्येक व्यक्ती, मग ती प्रमुख असो किंवा प्रोत्साहक असो, याबद्दलची तिला माहिती असलेली संपूर्ण परिस्थिती पूर्णतः व खरी उघड करावी या शर्तीवर, माफी देता येईल आणि अशी दिलेली कोणतीही माफी ही, संहितेच्या कलम ३०८ च्या प्रयोजनांसाठी, संहितेच्या कलम ३०७ अन्वये देण्यात आली आहे, असे मानण्यात येईल.

(४) विशेष न्यायालयास, या अधिनियमाच्या अन्य उपबंधांना अधीन राहून कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनार्थ, सत्र न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील आणि ते विशेष न्यायालय, संहितेमध्ये सत्र न्यायालयासमोरील संपरीक्षेकरिता विहित केलेल्या कार्यपद्धतीला धरून असेल तेथवर अशा अपराधाची, जणू काही ते सत्र न्यायालयच आहे अशा रीतीने संपरीक्षा करील.

(५) या अधिनियमाच्या अन्य उपबंधांना अधीन राहून, अतिरिक्त विशेष न्यायालयाकडे असलेले प्रत्येक प्रकरण हे, अशा अतिरिक्त न्यायालयाकडे जणूकाही कलम ४०६ अन्वये हस्तांतरित केलेले आहे, असे समजून त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

**प्रकरण हस्तांतरित करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या शक्ती.** ११. जेव्हा जेव्हा सर्वोच्च न्यायालयास असे दाखवून देण्यात येईल की, अंतिम न्याय देण्यासाठी या कलमान्वये आदेश देणे इष्ट आहे, तेव्हा तेव्हा सर्वोच्च न्यायालयाला विशिष्ट असे कोणतेही प्रकरण एका विशेष न्यायालयाकडून दुसऱ्या विशेष न्यायालयाकडे हस्तांतरित करण्याचे निदेश देता येतील.

१२. (१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष न्यायालयासमोरील सर्व कार्यवाही गुप्तरीत्या चालेल : साक्षीदारांना संरक्षण

परंतु, सरकारी अभियोक्त्याने तसा अर्ज केल्यास कोणतीही कार्यवाही किंवा त्याचा भाग खुल्या न्यायालयात करता येईल.

(२) विशेष न्यायालयास, त्याच्याकडे असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमधील साक्षीदाराने किंवा अशा साक्षीदाराशी संबंधित अशा सरकारी अभियोक्त्याने अर्ज केल्यास किंवा स्वत:हून, साक्षीदाराची ओळख व पत्ता गुप्त ठेवण्याकरिता त्यास योग्य वाटेल अशा उपाययोजना करता येतील.

(३) विशेषत: आणि पोटकलम (२) च्या उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, विशेष न्यायालय त्या पोटकलमान्वये जी उपाययोजना करू शकेल त्यात पुढील उपाययोजनांचा समावेश असेल—

(क) एखाद्या संरक्षित जागेत कार्यवाही आयोजित करणे;

(ख) आपल्या आदेशामध्ये किंवा न्यायनिर्णयामध्ये किंवा जनतेला सहजपणे पहावयास मिळेल अशा प्रकरणाच्या अभिलेखामध्ये साक्षीदारांची नावे व पत्ता यांचा उल्लेख करण्याचे टाळणे;

(ग) साक्षीदारांची ओळख व पत्ते उघड केले जाणार नाहीत हे निश्चित करण्यासाठी कोणतेही निदेश देणे.

(४) जी कोणतीही व्यक्ती, पोटकलम (२) खाली दिलेल्या कोणत्याही निदेशाचे व्यतिक्रमण करील ती, एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

१३. जेव्हा कोणत्याही अपराधाची दखल घेतल्यानंतर, विशेष न्यायालयाचे असे मत होईल की, तो अपराध अनुसूचित अपराध नाही, तर ते न्यायालय, त्याला अशा अपराधाची संपरीक्षा करण्याची अधिकारिता नसली तरीही, असे प्रकरण, अशा अपराधाची संपरीक्षा करण्याकरिता संहितेन्वये अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे हस्तांतरित करील आणि ज्याच्याकडे असे प्रकरण हस्तांतरित केले असेल त्या न्यायालयास, जणू काही त्या अपराधाची त्याने दखल घेतली आहे, असे समजून त्या अपराधाची संपरीक्षा चालू करता येईल. नेहमीच्या न्यायालयाकडे प्रकरणे हस्तांतरित करण्याची शक्ती.

१४. (१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयावर, शिक्षादेशावर किंवा विवादकालीन आदेश नसलेल्या कोणत्याही आदेशांवर हक्काची बाब म्हणून सर्वोच्च न्यायालयाकडे वस्तुस्थिती व कायदा या दोन्हीवर अपील करता येईल. अपील.

(२) पूर्वोक्ताव्यतिरिक्त एरव्ही, विशेष न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयावर, शिक्षादेशावर किंवा आदेशावर कोणत्याही न्यायालयाकडे अपील करता येणार नाही किंवा त्यांचे पुनरीक्षण करता येणार नाही.

(३) या कलमान्वये कोणत्याही न्यायनिर्णयावर, शिक्षादेशावर किंवा आदेशावर करावयाचे अपील हे त्या न्यायनिर्णयाच्या, शिक्षादेशाच्या किंवा आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत दाखल केले जाईल :

परंतु, सर्वोच्च न्यायालयाची जर अशी खात्री पटली की, अशा तीस दिवसांच्या अवधीत अपीलकाराला अपील दाखल न करता येण्यासाठी पुरेसे कारण होते, तर सर्वोच्च न्यायालय, असा उक्त कालावधी संपल्यानंतर केलेले अपील विचारात घेईल.

१५. (१) संहितेमध्ये किंवा अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक अनुसूचित अपराध हा, संहितेच्या कलम २, खंड (ग) च्या अर्थांतर्गत दखलपात्र अपराध मानण्यात येईल आणि "दखलपात्र प्रकरण" याचा, त्या खंडात व्याख्या केल्याप्रमाणे अन्वयार्थ लावला जाईल. संहितेचे विवक्षित उपबंध सुधारित रीतीने लागू होणे.

(२) संहितेचे कलम १६७ हे ज्या प्रकरणात अनुसूचित अपराध समाविष्ट आहेत त्या प्रकरणाबाबत फेरफारांच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे लागू होईल—

(क) त्याच्या पोटकलम (१) मधील "न्यायिक दंडाधिकारी" याचा निर्देश हा, "न्यायिक दंडाधिकारी" किंवा "कार्यकारी दंडाधिकारी" याचा निर्देश आहे, असा अन्वयार्थ लावला जाईल;

(ख) त्याच्या पोटकलम (२) मधील "पंधरा दिवस", "नव्वद दिवस" आणि "साठ दिवस" यांचा जेथे जेथे निर्देश येईल तेथे तेथे त्याचा अन्वयार्थ अनुक्रमे "तीस दिवस", "एक वर्ष" व "एक वर्ष" असा लावला जाईल; आणि

(ग) त्याचे पोटकलम (२क) वगळण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(३) संहितेची कलमे ३६६ ते ३७१ व कलम ३९२ ही, ज्या प्रकरणात अनुसूचित अपराध समाविष्ट आहेत अशा प्रकरणांच्या संबंधात, "सत्र न्यायालय" आणि "उच्च न्यायालय" याचा संदर्भ त्यात जेथे जेथे येत असेल तेथे तेथे त्याचा अनुक्रमे "विशेष न्यायालय" आणि "सर्वोच्च न्यायालय" असा अन्वयार्थ लावण्यात यावा, या फेरफारांच्या अधीन राहून लागू होतील.

(४) संहितेच्या ४३८ कलमातील कोणतीही गोष्ट, दहशतग्रस्त क्षेत्रात अनुसूचित अपराध केल्याचा दोषारोप असलेल्या व्यक्तींच्या अटकेसंबंधातील कोणत्याही प्रकरणाला लागू होणार नाही.

(५) संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचित अपराधांचा आरोप असलेली कोणतीही व्यक्ती जर अभिरक्षेत असेल, तर तिची,

(क) अशा मुक्ततेविषयीच्या अर्जाला विरोध करण्याची सरकारी अभियोक्त्याला संधी दिल्याखेरीज,

(ख) जेव्हा सरकारी अभियोक्ता अशा अर्जाला विरोध करील तेव्हा, ती अशा अपराधांची दोषी नाही आणि जामिनावर असताना ती कोणताही अपराध करण्याची शक्यता नाही; असा न्यायालयाला वाजवी कारणांवरून विश्वास वाटत असल्याखेरीज,—

—जामिनावर किंवा तिच्या बंधपत्रावर मुक्तता करता येणार नाही.

(६) पोटकलम (५), मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, जामीन मंजूर करण्यावरील मर्यादा ह्या, संहितेअन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये जामीन मंजूर करण्याबाबत असलेल्या इतर मर्यादांच्या व्यतिरिक्त आणखी असतील.

[1][विवक्षित विशेष न्यायालये बरखास्त करणे. १५क. जेथे, न्यायिक परिक्षेत्राचा समावेश असलेले क्षेत्र, दहशतग्रस्त क्षेत्र असण्याचे बंद होईल आणि अशा न्यायिक परिक्षेत्रासंबंधात स्थापन करण्यात आलेल्या विशेष न्यायालयासमोर किंवा अतिरिक्त विशेष न्यायालयासमोर कोणतीही प्रलंबित प्रकरणे नसतील, तेथे केंद्र शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशी विशेष न्यायालये किंवा अतिरिक्त विशेष न्यायालये बरखास्त करता येतील.]

अधिनियमाचे अधिभावी परिणाम. १६. (१) संहितेमध्ये किंवा इतर कोणत्याही कायद्यामध्ये, कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, संहितेचे उपबंध परिणामक असतील. परंतु, या अधिनियमात स्पष्टपणे उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, ते या अधिनियमाच्या उपबंधाशी जेथवर विसंगत नसतील तेथवर, ते विशेष न्यायालयासमोर होणाऱ्या कार्यवाहीला लागू पडतील; आणि संहितेच्या उक्त उपबंधाच्या प्रयोजनार्थ, विशेष न्यायालय, हे सत्र न्यायालय असल्याचे समजण्यात येईल.

(२) विशेषकरून आणि पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधाच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, संहितेच्या ३२६ आणि ४७५ या कलमांचे उपबंध, शक्य तेथवर विशेष न्यायालयासमोरील कार्यवाहीला लागू होतील, आणि त्या प्रयोजनार्थ, त्या उपबंधातील दंडाधिकाऱ्यांचा निर्देश हा विशेष न्यायालयाचा निर्देश असल्याप्रमाणे, त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल.

प्रत्यायोजन. १७. केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून, या अधिनियमान्वये वापरण्याजोग्या सर्व किंवा कोणत्याही शक्ती [कलम ४ च्या पोटकलम (२) खालील आणि कलम ७ च्या पोट कलम (२) खालील शक्ती वगळता] राज्य शासनाकडे प्रत्यायोजित करू शकेल.

नियम करण्याची शक्ती. १८. सर्वोच्च न्यायालय, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे नियम करू शकेल.

व्यावृत्ती. १९. (१) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, केंद्र शासनाच्या नौसेनेशी, सैन्याशी किंवा वायुसेनेशी किंवा अन्य कोणत्याही सशस्त्र बलाशी संबंधित असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, कोणत्याही न्यायालयाच्या किंवा इतर प्राधिकरणाच्या वापरण्याजोग्या अधिकारितेवर किंवा त्यांना लागू होणाऱ्या कार्यपद्धतीवर परिणाम होणार नाही.

(२) शंका निरसनार्थ, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही कायद्याच्या प्रयोजनार्थ, विशेष न्यायालय हे, सामान्य फौजदारी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

१८७२ चा अधिनियम १ याचे विशोधन. २०. भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ मध्ये कलम १११ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विशिष्ट अपराधांबाबत गृहीतक. १११क. (१) एखाद्या व्यक्तीवर,—

(क) अशांतता दूर करण्यासाठी, सार्वजनिक सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी व ती राखण्यासाठी उपबंध करणाऱ्या, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये अशांत क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या कोणत्याही क्षेत्रात, किंवा

(ख) जेथे एका महिन्याहून अधिक कालावधीपर्यंत सार्वजनिक अशांततेचा उद्रेक मोठ्या प्रमाणावर झालेला होता अशा कोणत्याही क्षेत्रात,

---

१. १९८५ चा अधिनियम ४५, कलम २ द्वारे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले.

पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही अपराध तिने केल्याचा आरोप असेल आणि अशी व्यक्ती, कोणत्याही सशस्त्र बलांचे किंवा सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याचे काम सोपवण्यात आलेल्या बलांचे सदस्य त्यांची कर्तव्ये पार पाडीत असताना जेव्हा जेव्हा त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी किंवा त्यांना रोखून ठेवण्यासाठी ज्या ठिकाणी किंवा ठिकाणाहून अग्निशस्त्रांचा किंवा स्फोटकांचा वापर करण्यात आला होता तेव्हा तेव्हा त्या ठिकाणी हजर होती, असे दाखवून देण्यात आले असेल तर एतद्‌विरुद्ध दाखवून देण्यात आले नसेल तर त्या व्यक्तीने असा अपराध केला होता, असे मानण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेले अपराध पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) भारतीय दंड संहितेचे (१८६० चा ४५) कलम १२१, कलम १२१क, कलम १२२ किंवा कलम १२३ यांखालील अपराध,

(ख) भारतीय दंड संहितेचे (१८६० चा ४५) कलम १२२ किंवा कलम १२३ यांखालील दंडनीय कट किंवा अपराध करण्याचा प्रयत्न करणे किंवा त्यास अपप्रेरणा देणे.

२१. (१) दहशतग्रस्त क्षेत्रे (विशेष न्यायालये) अध्यादेश, १९८४ (१९८४ चा ९) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, या अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती किंवा केलेली कार्यवाही ही, या अधिनियमाच्या समनुरूप उपबंधान्वये केलेली असल्याचे मानण्यात येईल.

[1][अनुसूची

[कलम २ (च्) पहा]

**भाग एक—भारतीय दंड संहिता**

१. भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) याच्या पुढील उपबंधांखालील अपराध :—
कलमे १२१, १२१क, १२२, १२३.

२. अपहरणविरोधी अधिनियम, १९८२ (१९८२ चा ६५) याच्या पुढील उपबंधांखालील अपराध—
कलमे ४ आणि ५.

**टीप १.**—फौजदारी स्वरूपाचा कट किंवा या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला एखादा अपराध करण्याचा प्रयत्न करणे किंवा त्या अपराधास अपप्रेरणा देणे हा, अनुसूचित अपराध असल्याचे मानले जाईल.

**टीप २.**—बेकायदेशीर जमावातील कोणत्याही सदस्याने केलेला या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला कोणताही अपराध हा, जमावाच्या अन्य प्रत्येक व्यक्तीने केलेला अनुसूचित अपराध असल्याचे मानण्यात येईल.]

---

१. १९८५ चा अधिनियम ४५, कलम ३ द्वारे मूळ अनुसूचीऐवजी ही अनुसूची दाखल केली.

विवक्षित प्रकरणांच्या संबंधात विशेष न्यायालयाने अधिकारितेचा वापर करणे बंद होणे आणि प्रलंबित प्रकरणे हस्तांतरित करणे.

[1][ (१) मुख्य अधिनियमाच्या कलम (७) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु पोट कलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने या अधिनियमाच्या प्रारंभानंतर विशेष न्यायालय, या अधिनियमाच्या कलम ३ द्वारे बदली दाखल केलेल्या, मुख्य अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या अपराधांव्यतिरिक्त किंवा त्या अपराधाशी संबंधित असलेल्या अपराधाव्यतिरिक्त कोणत्याही अन्य अपराधाची दखल घेणार नाही किंवा त्या अपराधाबाबत त्या न्यायालयास अधिकारिता असणार नाही, किंवा ते अधिकारितेचा वापर करणार नाही.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी कोणत्याही विशेष न्यायालयासमोर प्रलंबित असलेले आणि, या अधिनियमाच्या कलम ३ द्वारे बदली दाखल केलेल्या मुख्य अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या अपराधाव्यतिरिक्त किंवा त्या अपराधाशी संबंधित असलेल्या अपराधाव्यतिरिक्त अन्य एखाद्या अपराधासंबंधातील प्रत्येक प्रकरण, अशा प्रारंभानंतर शक्य तेवढ्या नंतर, मुख्य अधिनियम अधिनियमित झाला नसला तर, त्या अपराधाची दखल घेण्याची ज्या न्यायालयाला अधिकारिता असती त्या न्यायालयाकडे हस्तांतरित होईल, आणि ज्या न्यायालयाकडे अशा रीतीने ते प्रकरण हस्तांतरित होईल ते न्यायालय अशा हस्तांतरणाच्यावेळी ते प्रकरण ज्या टप्प्यांवर असेल त्या टप्प्यापासून पुढे, जणू काही त्या न्यायालयाने मुळातच त्या प्रकरणाची दखल घेतली होती आणि ते प्रकरण त्यावेळी त्याच न्यायालयासमोर प्रलंबित होते असे समजून त्या प्रकरणावर पुढील कार्यवाही करील.

(३) हे कलम मुख्य अधिनियमाचे कलम असल्याप्रमाणे मानण्यात यावे आणि या कलमातील शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ तदनुसार लावण्यात यावा.]

---

१. १९८५ चा अधिनियम ४५, कलम ४ द्वारे हे उपबंध दाखल करण्यात आले.